# जाहिरात
## महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग
## वैद्यकीय अधिकारी, गट अ ची पदे कंत्राटी स्वरुपात भरण्याकरिता
## पदभरती जाहिरात

यवतमाळ जिल्हातील सार्वजनिक आरोग्य विभाग अंतर्गत आरोग्य संस्थामध्ये महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट अ ( MBBS/PG) या संवर्गातील वैद्यकीय अधिकारी या पदावरील कंत्राटी पदभरती निव्वळ ११ महिन्याकरिता MBBS /BAMS पात्रताधारक उमेदवाराकडून विनंती अर्ज मागविण्यात येत आहेत. जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय यवतमाळ, या कार्यालयामध्ये खालील पदासाठी पात्र उमेदवाराकडून अर्ज मागविण्यात येत आहे. तसेच अटी व शर्ती zpyavatmal.gov.in या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आलेले आहेत. अर्ज भरण्याची अंतिम दिनांक १६/१२/२०२२ रोजी (सुट्टीचे दिवस वगळता) सायंकाळी ५.०० वा पर्यंत राहील. MBBS/PG या उमेदवार यांना प्राधान्य देण्यात येईल.

| अ.क्र | विवरण | जिल्हा शल्य चिकित्सक | | जिल्हा आरोग्य अधिकारी |
|---|---|---|---|---|
| १ | पदाचे विवरण | रिक्त | | रिक्त |
| | | 13 | | 20 |
| २ | शैक्षणिक अहर्ता | MBBS / PG / BAMS | | |
| 3 | एकत्रित मानधन | MBBS | १. आदिवासी व दुर्गम भागामध्ये रु. ८००००/- प्रति महा<br>2. इतर भागामध्ये रु. ७५०००/- प्रति महा | |
| | | विशेष तज्ञ | १. आदिवासी व दुर्गम भागामध्ये रु. ९००००/- प्रति महा<br>2. इतर भागामध्ये रु. ८५०००/- प्रति महा | |
| | | BAMS | 1. आदिवासी व दुर्गम भागामध्ये रु. ४५०००/- प्रति महा<br>2. इतर भागामध्ये रु ४००००/- प्रति महा | |

**अटी व शर्ती :-**

१) नियुक्ती ही तात्पुती नियुक्ती केवळ ११ महिन्यासाठी किंवा तसेच पदावर नियीमत वैद्यकिय अधिकारी / अस्थाई एमबीबीएस अधिकारी तसेच निवड मंडळामार्फत अधिकारी उपलब्ध होईल त्या दिनांकापर्यंत या पैकी जे अगोदर घडेल तो पर्यंत अमलात राहील. त्या दिवसा पासुन नियुक्त्या आपोआप संपुष्ठात येतील.

२) नियुक्ती ही तात्पुरत्या स्वरुपात नेमणुक असुन कंत्राटी वैद्यकिय अधिकारी वार्षिक वेतनवाढ अनुज्ञेय असणर नाही.

३) नियुक्ती निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात असल्याने मला नियीमत वैद्यकिय अधिकारी प्रमाणे वेतन मिळणार नाही. तसेच म.ना.से. (रजा) नियम लागु राहणार नाहीत तसेच गटविमा योजना, भविष्य निर्वाह निधी अथवा तत्सम कोणतेही लाभ मिळण्यास पात्र राहणार नाहीत.

४) कंत्रटी नियुक्ती केवळ तात्पुत्या स्वरुपात असल्याने मी पदावर कायम करता येणार नाही. व त्या पदावर आपला धारणधिकार असणार नाही.

५) केवळ तात्पुरती व कंत्राटी नियुक्ती असल्याने सेवा म.ना.से.(निवृत्ती वेतन) नियम १९८२ मधिल कलम नियम ३० नुसार अहर्ताकारी सेवा म्हणुन गणण्यात येणार नाही. किंवा सेवा जेष्ठता व अन्य कोणत्याही प्रकाराच्या सेवा विषयक बाबीसाठी ग्राहय धरली जाणार नाही.

६) कंत्राटी वैद्यकिय अधिकारी म.ना.से (वर्तणुक) नियम १९७९ मधील तरतुदी लागू होतील.

७) सेवा काळात सेवामुक्त व्हायचे असल्यास एक महिन्याची नोटीस किंवा एक महिन्याचे मानधन भरुन कार्यमुक्त होता येईल.

८) रुजू होण्यापुर्वी विहित नमुन्यातील प्रतिज्ञापत्र ( १००/- चे बॉन्ड पेपरवर) संबंधीत कार्यालयाकडे जमा करण्यात यावे.

९) केवळ तात्पुरती नियुक्ती दिलेलया उमेदवाराची भविष्यात विहीत मार्गाने नियमित पदावर नियुक्ती झाल्यास तात्पुरती सेवा माझ्या नियमित सेवेस लागु केली जाणार नाही.

Scanned with OKEN Scanner

१०) कंत्राटी वैद्यकिय अधिकाऱ्यांच्या सेवा खालील कारणास्तव समाधानकारक नसल्यास कोणत्याही क्षणी कंत्राटी सेवा पुर्वसुचना न देता समाप्त करण्यात येतील.

अ. दोन दिवसापेक्षा जास्त कालावधी साठी विना परवानगी गैरहजर असल्यास

ब. कामामध्ये निष्काळजीपणा

क. बायोमेट्रीक प्रणालीवर हजेरी न लवणे

ड. अकार्यक्षम कामकाज असणे /सेवेची कर्तव्य व जबाबदाऱ्या कटाक्षाने न पाळल्यास

ई. गैरवर्तन / गैरव्यवहार केल्याचे निदर्शास येणे.

११) न्यायलीन प्रकरणे प्रलंबीत असल्यास अशा उमेदवारानी अर्जा मध्ये उल्लेख करण्यात यावे.

१२) वैद्यकिय अधिकारी यांनी अर्ज सादर करत्यावेळी शासना कडून निवड झालेले असल्यास त्यांनी सदर पदाचा राजीनामा मंजुर न झालेल्या अशा वैद्यकिय अधिकारी यांनी अर्ज करण्यात येऊ नये.

१३) तसेच प्रथम प्राधान्य MBBS (PG) / MBBS यांना राहील हे उपलब्ध न झाल्यास मग BAMS (PG) / BAMS यांचा विचार करण्यात येईल.

**सदस्य सचिव**
**जिल्हा निवड समिती तथा**
**जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय यवतमाळ**

**अध्यक्ष**
**जिल्हा निवड समिती तथा**
**जिल्हाधिकारी, यवतमाळ**

Scanned with OKEN Scanner